**<u>ठळक बातम्या</u>**

- ऑपरेशन सिंदूरच्या वर्षपूर्ती निमित्त भारतीय सैन्याचा अतुलनीय पराक्रम आणि धैर्याचं देशभरातून कौतुक

- ४० वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या कामगारांच्या मोफत आरोग्य तपासणीला ESIC रुग्णालयात सुरुवात

- बिहारमध्ये मंत्रिमंडळ विस्तार, नितीश कुमार यांच्या पुत्रासह ३० जणांचा शपथविधी

- तमिळनाडूमध्ये टीव्हीकेचे प्रमुख विजय यांनी पुन्हा घेतली राज्यपालांची भेट, अण्णाद्रमुकचे आमदार पुद्दुचेरीमधल्या रिसॉर्टवर

**आणि**

- कुख्यात गुंड सोहराबुद्दीनच्या कथित एन्काऊंटर प्रकरणी सर्व २२ आरोपी निर्दोष असल्याचा मुंबई उच्च न्यायालयाचा निर्वाळा

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूरला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्तानं आज देशभरातून भारतीय सैन्य दलांच्या पराक्रमाचा गौरव केला जातोय. या मोहिमेला मिळालेल्या अभूतपूर्व यशातून भारतीय सैन्य दलांचं अतुलनीय धैर्य आणि निष्ठा दिसून येते. पहलगाममधल्या दुर्दैवी हल्ल्याला भारतीय सैन्यानं योग्य प्रत्युत्तर दिलं असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. भारताची शांतता, एकता आणि सार्वभौमतेला विस्कळीत करण्याच्या प्रयत्न करणाऱ्यांना ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतीय सैन्यदलांनी जोरदार आणि योग्य प्रत्युत्तर दिल्याचं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन म्हणाले.

दहशतवाद हद्दपार करणं आणि त्यांना मदत करणाऱ्यांचा नायनाट करण्यासाठी भारत कटीबद्ध असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यासंदर्भात म्हणाले. या अतुलनीय कामगिरीबद्दल संपूर्ण देश भारतीय सैन्याला अभिवादन करतो. या कामगिरीतून भारतीय सैन्याची व्यावसायिकता, तयारी आणि समन्वय दिसून येतो असंही ते समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हणाले. या मोहिमेला एक वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्तानं प्रधानमंत्र्यांनी ऑपरेशन सिंदूरचा

बोधचिन्ह असलेला डीपी समाजमाध्यमांवर ठेवला आहे. देशातल्या नागरिकांनीही हा डीपी ठेवावा असं आवाहन त्यांनी केलं आहे.

ऑपरेशन सिंदूरमुळे देशाच्या शत्रूंना भारताच्या शक्तीची कल्पना आली असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले. या मोहिमेच्या दरम्यान तिन्ही सेना दलांनी दाखवलेल्या समन्वयाचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी कौतुक केलं आहे. या मोहिमेमुळं आत्मनिर्भरता वाढवण्याच्या आणि देशाच्या सामर्थ्याला बळकट करण्याच्या प्रयत्नांना बळ मिळाल्याचं त्यांनी सांगितलं

**<><><><><>**

देशभरातल्या ४० वर्षांपेक्षा अधिक वयाच्या कामगारांसाठीची मोफत वार्षिक आरोग्य तपासणी मोहीम आजपासून सुरू झाली. ESIC अर्थात कर्मचारी राज्य विमा महामंडळाच्या दवाखान्यात कामगारांना या सुविधेचा लाभ घेता येईल. केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी नवी दिल्लीत या मोहिमेचं उद्घाटन केलं. याविषयी ते म्हणाले

- **- होल्ड मांडवीय बाइट - -**

**<><><><><>**

बिहारमधे सम्राट चौधरी यांच्या नेतृत्वाखालच्या भाजपा सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार आज पाटणा इथल्या गांधी मैदानावरल्या समारंभात झाला. विजय कुमार सिन्हा आणि नितीशकुमार यांचे पुत्र निशांतकुमार यांच्यासह ३० जणांनी आज मंत्रिपदाची शपथ घेतली. राज्यपाल निवृत्त लेफ्टनंट जनरल सय्यद अता हसनैन यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. माजी मंत्री श्रवण कुमार, श्रेयसी सिंह, डॉ दिलीपकुमार जयस्वाल, रामकृपाल यादव, नितीश मिश्रा यांनीही आज मंत्रिपदाची शपथ घेतली. या सोहळ्याला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि संयुक्त जनता दलाचे अध्यक्ष नितीशकुमार उपस्थित होते.

**<><><><><>**

तमिळनाडूमधे सरकार स्थापन करण्याचा दावा करण्यासाठी  तमिळगा वेत्री कळघमचे प्रमुख जोसेफ विजय यांनी आज राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांची लोकभवनात दुसऱ्यांदा भेट घेतली. यावेळी त्यांनी काँग्रेसच्या पाठिंब्याचं पत्र राज्यपालांकडे सादर केलं. राज्यपालांनी विजय यांना सरकार स्थापन करण्यासाठी आमंत्रित केलं आहे की नाही हे अद्याप कळू शकलं

नाही. तमिळनाडू विधानसभेत टिव्हीकेने २३४पैकी१०८जागा जिंकल्या आहेत. बहुमतासाठी ११८ आमदारांची गरज आहे, टिव्हीकेला काँग्रेसच्या पाच आमदारांचा पाठिंबा आहे, मात्र तरीही ही आघाडी बहुमताचा आकडा गाठू शकली नाही.

**दरम्यान,** सत्तास्थापनेबाबतच्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर अण्णा द्रमुकच्या ४० हून अधिक आमदारांना पुदुच्चेरीमधल्या एका रिसॉर्टमधे हलवण्यात आलं आहे. हे आमदार कड्डलोर, विलुपुरम, कल्लकुरिची या जिल्ह्यांमधले आहेत. या रिसॉर्टच्या भोवती पोलिसांचा कडक पहारा ठेवण्यात आला आहे.

**<><><><><>**

केरळमच्या नव्या मुख्यमंत्र्यांची निवड केंद्रीय नेतृत्त्व करणार असल्याचं काँग्रेसच्या सुत्रांनी आज सांगितलं. पक्षाच्या विधीमंडळ पक्षाची बैठक आज तिरुवनंपुरमध्ये झाली पण त्यात मुख्यमंत्रीपदाच्या संदर्भात कुठलाही निर्णय झाला नाही. काँग्रेसचे निरीक्षक प्रत्येक आमदाराशी व्यक्तीगत चर्चा करत आहेत. या आमदारांचं मत ते केंद्रीय नेतृत्त्वाला कळवणार आहेत. काँग्रेसने या विधानसभा निवडणुकीत १४० पैकी १०२ जागा जिंकल्या आहेत.

**<><><><><>**

आसामच्या नवनिर्वाचित सरकारचा शपथविधी १२ मे रोजी होणार असून याला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहतील असं आसामचे मुख्य सचिव रवी कोटा यांनी सांगितलं. भाजपाच्या विधिमंडळ पक्षाच्या नेत्याची निवड रविवारी केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांच्या उपस्थितीत होणार आहे.

**<><><><><>**

पश्चिम बंगालमधले भाजपा नेते सुवेंदु अधिकारी यांचे खासगी स्वीय सहाय्यक चंद्रनाथ रथ यांची काल रात्री उत्तर २४ परगणा जिल्ह्यात मध्यमग्राम इथं गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. चार दुचाकींवरून आलेल्या हल्लेखोरांनी चंद्रनाथ यांची गाडी थांबवून त्यांच्यावर अंदाधुंद गोळीबार केला असं प्रत्यक्षदर्शींनी सांगितलं. चंद्रनाथ यांच्या गाडीचे चालक बुद्धदेव बेरा हेही गंभीर जखमी झाले आहेत. चंद्रनाथ यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे, त्यानंतर त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येतील.

भाजपाने या हत्येला तृणमूल जबाबदार असल्याचा आरोप केला आहे. तृणमूलने हा आरोप फेटाळला असून हत्येचा निषेध केला आहे.  माकप आणि काँग्रेसनेही हत्येचा निषेध केला आहे.

<><><><><>

पुदुच्चेरीचे मुख्यमंत्री एन रंगासामी यांनी नायब राज्यपाल के. कैलाशनाथन यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा सुपूर्द केला, यामुळे पुदुच्चेरीत नव्या सरकारच्या स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे. विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर नायब राज्यपालांनी काल १५ वी विधानसभा विसर्जित करण्याचे आदेश दिले. पुदुच्चेरी विधानसभेच्या ३० जागांपैकी राष्ट्रीय लोकशाही आघाडीने १८ जागा जिंकून बहुमत प्राप्त केलं आहे. यात एन आर काँग्रेसने १२, भाजपाने ४, अण्णा द्रमुक आणि लचिया जननायका कच्ची या पक्षांनी प्रत्येकी एक जागा जिंकली आहे.

<><><><><>

कुख्यात गुंड सोहराबुद्दीन, त्याची पत्नी कौसर बी आणि त्याचा मदतनीस तुलसीराम प्रजापती यांच्या कथित बनावट एन्काऊंटर प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयानं २२ जणांना निर्दोष ठरवलं आहे. विशेष न्यायालयानं २०१८ मध्ये दिलेल्या निकालात सर्व २२ आरोपींना निर्दोष ठरवलं होतं. या निर्णयाला सोहराबुद्दीनच्या भावांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं.

अमदाबादजवळ नोव्हेंबर २००५ मध्ये झालेल्या कथित एन्काऊंटरमध्ये सोहराबुद्दीनची हत्या झाली होती. त्यानंतर काही दिवसांनी त्याची पत्नी कौसर बी हिची हत्या झाली होती. याप्रकरणातला महत्त्वाचा साक्षीदार असलेल्या प्रजापती याचा डिसेंबर २००६ मध्ये झालेल्या कथित एन्काऊंटरमध्ये मृत्यू झाला होता. याप्रकरणात फार्म हाऊसचा मालक आणि गुजरात तसंच राजस्थान पोलिसांच्या २१ अधिकारी-कर्मचाऱ्यांवर एन्काऊंटरचा आरोप झाला होता. या सर्वांनी सोहराबुद्दीन आणि इतर दोघांना आधी फार्म हाऊसमध्ये अवैधरित्या डांबून ठेवलं आणि नंतर त्यांचा एन्काऊंटर झाल्याचा दिखावा केला, असा आरोप सर्वांवर होता. याप्रकरणी हत्येचा कट रचणं आणि त्यात आरोपींचा सहभाग होता हे सिद्ध करण्यात अपयश आल्याचं निरीक्षण विशेष न्यायालयानं नोंदवलं होतं.

<><><><><>

व्हिएतनामचे अध्यक्ष तो ला यांनी आज मुंबईत राष्ट्रीय शेअर बाजाराला भेट दिली. यावेळी त्यांनी भारताच्या शेअर बाजाराच्या सामर्थ्याची प्रशंसा केली. दुपारी ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार आहेत. तसंच एका व्यावसायिक परिषदेत हे दोन्ही नेते सहभागी होतील. संध्याकाळी राष्ट्राध्यक्ष लाम हे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची लोकभवनात भेट घेतील.

**<><><><><>**

गेल्या २२ दिवसात जम्मू आणि काश्मिरमध्ये अंमली पदार्थ विरोधी मोहिमेच्या अंतर्गत ५१८ जणांना अटक झाली असून ४८१ एफआयआर नोंदवण्यात आले आहेत. याप्रकरणी पोलिसांनी २४ मालमत्ता जप्त केल्या आहेत किंवा नष्ट केल्या आहेत.

**<><><><><>**

ईडीनं आज मोहाली आणि चंदीगडमध्ये १२ ठिकाणी छापे टाकले. ग्रेटर मोहाली क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून जमीन वापर हस्तांतरणाचा परवाना मिळवताना मोठ्या प्रमाणात झालेल्या घोटाळ्यांप्रकरणी ही छापेमारी सुरू आहे. याप्रकरणी विकासकांना मदत करणाऱ्या नितीन गोहालचा तपास सुरू आहे, असं ईडीनं सांगितलं. पंजाबचे मुख्यमंत्र्यांच्याचे विशेष कार्य अधिकारी राजबीर गुहमान यांचा तो साथीदार आहे.

**//<><><><><>//**